**१) श्री. संदीप खंडू काळे**
उ.वय ३६ वर्षे, धंदा - शेती
आधार क्र. ६७४६ ६६२९ ६१२७
पॅनकार्ड नं. क्यूवायएमपीके७६५०सी
**२) सौ. सुनिता संदीप काळे**
उ.वय ३५ वर्षे, धंदा - गृहिणी
आधार क्र. ७५२० ४८३८ ३८२०
पॅनकार्ड नं. पीएचएनपीके९२१२डी
दोघेही रा. बाजगीरा, भगूर घोटी रोड,
विठ्ठल रूख्मिणी मंदिर, लहवित,
ता.जि. नाशिक - ४२२५०२

— **लिहून घेणार**

- यांसी -

**१) श्री. शांताराम वसंत वाघमारे**
उ.वय ३८, धंदा - नोकरी
आधार क्र. ७५१७ २१०७ ८३९४
पॅनकार्ड नं. एईजीपीव्ही८७२३एच
**२) सौ. योगिता शांताराम वाघमारे**
उ.वय ३७, धंदा - गृहिणी
आधार क्र. ९८३५ १७७५ २७१६
पॅनकार्ड नं. एएफसीपीडब्ल्यू०४१९जी
दोघेही रा. गायकवाड वस्ती, मु. करूले,
पो. निळवंडे, ता. संगमनेर, करूळे,
नानाज दुमाला, अ. नगर-४२२६११

— **लिहून देणार**

**कारणे साठेखत करारनामा लिहून देतात ते खालीलप्रमाणे -**

**१) मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी

मौजे भगूर या गावचे शिवारातील व देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्ड हद्दीतील स.नं. ३०६/१ए/५, प्लॉट नं. ०४ (चार) यांसी क्षेत्र ६७५.००चौ.मी. यावर बांधण्यात आलेल्या 'श्री सिद्धी' अपार्टमेंट मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं. ४ यांसी कार्पेट क्षेत्र ४७.८६ चौ.मी. + बाल्कनी/गार्डन क्षेत्र १७.९३ एकूण क्षेत्र ६५.७९ यांसी चतु:सिमा मंजूर बिल्डींग प्लॅनप्रमाणे, ही मिळकत

येणेप्रमाणे चतु:सिमांकित मिळकत जल, तरू, काष्ट, पाषाण व जाणेयेणेचे वागवहिवाटीच्या हक्कांसह दरोबस्त मिळकत.

उपरोक्त दस्तात लिहून घेणार यांचा उल्लेख तुम्ही व लिहून देणार यांचा उल्लेख आम्ही असा केलेला आहे.

२) वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत लिहून देणार यांनी श्री सिद्धी विनायक बिल्डर ॲण्ड डेव्हलपर्स पार्टनरशीप फर्म यांचेकडून दि. २८.०२.२०२५ रोजी फरोक्त खरेदीखताने खरेदी घेतलेली आहे. सदरचा खरेदीखताचा दस्त मे. सब रजिष्ट्रार साहेब, नाशिक-२ यांचे कार्यालयात दस्त नं. २३४८/२०२५ अन्वये नोंदविण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटला त्यांचे नावाची नोंद दाखल करण्यात आलेली आहे. वर नमूद केल्याप्रमाणे आजमितीस लिहून देणार हे मिळकतीचे मालक आहेत.

३) लिहून देणार यांनी कौटुंबिक आर्थिक अडचणींमुळे सदरची मिळकत विक्रीस काढली. लिहून घेणार यांना देखील मिळकत खरेदी करावयाची असल्याने त्यांनी लिहून देणार यांना मिळकत खरेदीविषयी इच्छा व्यक्त केली. या अनुषंगाने उभयतांमध्ये

बोलणी, बैठका होवून लिहून देणार यांनी दस्ताचा विषय असलेली मिळकत लिहून घेणार यांना खरेदी देण्याचे निश्चित केले व सदरचा दस्त नोंदवून ठेवण्याचे उभयतांमध्ये ठरलेले आहे.

४) त्या अनुषंगाने उभयतांमध्ये चर्चा, विचार विनिमय होवून उपरोक्त मिळकतीची खरेदी विक्रीची किंमत एकूण रक्कम रूपये २१,००,०००/- (अक्षरी रूपये एकवीस लाख मात्र) इतकी निश्चित करण्यात आलेली आहे. सदरची किंमत ही आजचे चालू व प्रचलित बाजारभावाप्रमाणे योग्य व वाजवी असून किंमतीबाबत लिहून देणार व लिहून घेणार यांच्यामध्ये काहीएक तक्रार नाही.

५) वर कलम १ यात नमूद केलेल्या मिळकतीचा कब्जा हा खरेदीखताच्या वेळेस लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना द्यावयाचा आहे.

६) सदरील कलम १ मध्ये नमूद केलेली मिळकत ही कोणत्याही सरकारी अगर निमसरकारी अथवा खाजगी स्वराज्य संस्थेने ॲक्वायर अथवा रिक्वायर केलेली नाही. तशा आशयाच्या नोटीस आजपावेतो आलेल्या नाहीत. सदर मिळकतीबाबत लिहून घेणार यांनी मिळकतीच्या स्वामित्वाबाबत खात्री करून घेतलेली आहे.

७) वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार हा लिहून देणार यांचे व त्यांचे वालीवारस यांचेवर बंधनकारक आहे व राहील.

८) वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीचा साठेखत करारनामा व फरोक्त खरेदीखताचा खर्च म्हणजेच स्टॅम्प, नोंदणी फी, वकील फी, लिहिणावळ इ. हा लिहून घेणार यांनी करावयाचे ठरलेले आहे.

१३) सदरील अटी व शर्ती लिहून देणार व लिहून घेणार यांना मान्य व कबूल असून त्यांचे वालीवारसांवर सदरील अटी बंधनकारक आहेत.

येणेप्रमाणे साठेखत करारनामा आम्ही आमचे राजीखुशीने, स्वसंतोषाने, समजून, उमजून, लिहून कोणत्याही धाक दडपणास बळी न पडता मुक्त संमतीने अटी वाचून पाहून नियमांचे पालन करण्याचे कबुल करून तुमचे लाभांत लिहून दिला आहे.

**हा साठेखत करारनामा लिहून दिला असे.**

**ठिकाण : नाशिकरोड**
**दिनांक : २३.०९.२०२६**

**१) श्री. संदीप खंडू काळे**

**२) सौ. सुनिता संदीप काळे**
**(लिहून घेणार)**

**१) श्री. शांताराम वसंत वाघमारे**

**२) सौ. योगिता शांताराम वाघमारे**
**(लिहून देणार)**

साक्षीदार :-

१. -------------------- २. --------------------